
# बसवंत गार्डन कट्टा




बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्र तसेच बसवंत गार्डन हे दोन्ही प्रकल्प केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे; तर साऱ्या देशभरातील नागरिकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले आहेत. येथे दिले जाणारे मधमाशी पालनाचे शास्त्रीय प्रशिक्षण कृषी उत्पादन वाढ आणि मधमाशीजन्य पदार्थांच्या माध्यमातून होणारी रोजगार निर्मिती या दोन्ही बाबतीत पूरक ठरत आहे.

बसवंत गार्डन, आदर्श ग्राम संस्कृतीचे मॉडेल असलेले सेवरगांव या संकुलांमधील फळप्रक्रिया उद्योग, उपाहारगृह, सोविनीअर शॉपी, स्पोर्ट्स झोन, छोट्या मुलांसाठी खेळांच्या सुविधा असणारी स्वतंत्र जागा, पेंटिंग झोन अशी असंख्य आकर्षणे पर्यटकांना आकर्षित करतात. या परिसरात मधमाशी पालन व्यवसायाच्या संदर्भात परिसंवाद आयोजित केले जातात. मान्यवरांच्या सदिच्छा भेटी, अनेक शाळा व महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या सहलीही आयोजित करतात. या साऱ्या उपक्रमांची थोडक्यात माहिती.

## गावोगावी कृषिमाल प्रक्रिया उद्योग सुरू होण्याची गरज : ॲड. नितीन ठाकरे

**राज्यस्तरीय प्राचार्य/ मुख्याध्यापक परिषदेचे उत्साहात उद्घाटन**




**राज्यस्तरीय प्राचार्य/ मुख्याध्यापक परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना ॲड.श्री. नितीन ठाकरे. समवेत व्यासपीठावर डॉ.श्री. भास्कर गायकवाड, डॉ.श्री. बी.बी. पवार, डॉ.श्री. प्रमोद रसाळ, डॉ. दीप्ती देशपांडे, श्री. कल्पेश गोसावी, श्री. प्रदीप देशपांडे आणि श्री. संजय पवार.**

निसर्गाचा लहरीपणा तसेच ग्लोबल वॉर्मिंग अशा संकटांमुळे आज शेतकरी खूप मोठ्या अडचणीत सापडला आहे. पिकविण्याची बुध्दी त्याच्याकडे आहे पण विकण्याचे ज्ञान मात्र नाही. म्हणूनच ग्रामीण भागात कृषिमाल प्रक्रिया उद्योग सुरू होणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर मधमाशी पालन व्यवसाय हा पर्यटन उद्योगाला चालना देऊ शकतो, हे बसवंत मधमाशी पालन- प्रशिक्षण केंद्राने सिध्द केले आहे, असे प्रतिपादन नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस ॲड.श्री. नितीन ठाकरे यांनी केले.

बसवंत गार्डन (पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक) येथील 'पूर्वा केमटेक- ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.' संचलित बसवंत कृषी उद्योग पर्यटन केंद्राच्या वतीने दि. १ ते १० ऑगस्ट २०२३ दरम्यान आयोजित राज्यस्तरीय प्राचार्य/ मुख्याध्यापक परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सचिव प्राचार्या डॉ.

दीप्ती देशपांडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

यावेळी बोलताना डॉ. देशपांडे म्हणाल्या की, शेतीपूरक पर्यावरण निर्माण करून आणि निसर्गाशी मैत्री करून त्याचे संवर्धन कसे करता येईल, याचे छान प्रात्यक्षिक बसवंत मधमाशी प्रशिक्षण केंद्राद्वारे विविध उपक्रमांतून दाखवले जात आहे. या केंद्राच्या माध्यमातून; तरुणांना उद्योजक बनविण्यासाठी मधमाशी पालन व्यवसायाला 'Old in new way' या दृष्टीने नवीन परिमाण देऊन 'पूर्वा केमटेक'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांनी हा प्रकल्प सुरू केला आहे. येथे विद्यार्थी सहली आयोजित करून त्यांना ज्ञान आणि त्याबरोबरच मनोरंजनाचा लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन त्यांनी उपस्थित प्राचार्य व मुख्याध्यापकांना केले.

यावेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. प्रमोद रसाळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच 'पूर्वा' परिवाराचे मार्गदर्शक तथा ज्येष्ठ कृषितज्ञ डॉ.श्री. बी.बी. पवार, 'पूर्वा कृषिदूत'चे संपादक व ग्रीनझोन ॲग्रोकेमचे तांत्रिक संचालक डॉ.श्री. भास्कर गायकवाड, श्री. कल्पेश गोसावी, श्री. प्रदीप देशपांडे आदी मान्यवर व्यासपीठावर होते.

येथील मधमाशी उद्यान- मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्रातून मधु-उद्योजकतेचे; तसेच त्या अनुषंगाने निसर्गस्नेही अशा प्रकल्प व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिकांसहित मार्गदर्शन केले जाते. रूढ शालेय शिक्षणाची धुरा वाहणाऱ्या प्राचार्य/ मुख्याध्यापकांच्या सहभागातून हे कार्य अधिक व्यापक आणि विद्यार्थिकेंद्री करण्याचे उद्दिष्ट या परिषदेच्या आयोजनामागे आहे. डोंगरदऱ्यांतील साहसी पर्यटनातील संभाव्य धोके लक्षात घेता, या केंद्रातील सुरक्षित वातावरणात साहसी खेळ तसेच विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांचे ज्ञानाबरोबरच मनोरंजनही होते, असे श्री. संजय पवार यांनी प्रास्ताविक करताना सांगितले.

विद्यार्थ्यांमध्ये कृषी उद्योजकता विकासाच्या संदर्भात जाणीव- जागृती निर्माण होण्याच्या दृष्टीने, राज्यभरातील विविध शैक्षणिक संस्थांमधील शाळांच्या प्राचार्य/ मुख्याध्यापकांना या परिषदेत दरवर्षी आमंत्रित करण्यात येते. मधमाशी पालनातून उद्योजकता वाढीसंदर्भात मौलिक शैक्षणिक मार्गदर्शन व्हावे, असा या परिषदेचा उद्देश आहे.

याप्रसंगी डॉ. भास्कर गायकवाड, पूर्वा केमटेकचे संचालक श्री. विजय पवार, ग्रीनझोन ॲग्रोकेमचे संचालक श्री. महेश पाटील, श्री. संदीप वाघ तसेच श्री. संदीप सोनवणे, बसवंत मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्राचे व्यवस्थापक श्री. नितीन कराळे आदींसह राज्यभरातील अनेक प्राचार्य/ मुख्याध्यापक उपस्थित होते. डॉ. भास्कर गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले तर सूत्रसंचालन सायली लभडे यांनी केले. ■




**मान्यवरांच्या 'मधु-संकल्पा'ला लाभली 'बीनिव्हर्स' ची पार्श्वभूमी...**

# जीवसृष्टीच्या सृजनामध्ये मधमाशीचा मोलाचा वाटा : प्राचार्य डॉ. पुंडलिक रसाळ

## प्राचार्य/ मुख्याध्यापक परिषदेची यशस्वी सांगता




प्राचार्य/ मुख्याध्यापक परिषदेच्या सांगता समारंभात मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. पुंडलिक रसाळ. समवेत व्यासपीठावर प्रा. वारुंगसे, श्री. दिलीप अहिरे, श्री. विजय पवार, श्री. राजेंद्र निकम, श्री. लक्ष्मण महाडिक आदी मान्यवर.

माणूस हा निसर्गातील एक महत्त्वाचा घटक आहे. साहजिकच निसर्गाचे संवर्धन आणि संरक्षण करणे हे त्याचे परम कर्तव्य आहे. मात्र आज विकासाच्या नावाखाली जीवसृष्टीतील अनेक उपयुक्त कृमी-कीटकांचा संहार करण्यात हाच माणूस दुर्दैवाने अग्रेसर आहे. मधमाशी हा अत्यंत महत्त्वाचा कीटक असून जीवसृष्टीच्या सृजनामध्ये त्याचा सगळ्यात मोठा वाटा आहे. त्यामुळे त्याचे संरक्षण- संवर्धन करणे अत्यावश्यक आहे, असे उद्गार सिन्नर महाविद्यालयाचे प्राचार्य व मानसशास्त्राचे अभ्यासक डॉ.श्री. पुंडलिक रसाळ यांनी काढले.

पिंपळगाव बसवंत (ता. निफाड, जि. नाशिक) येथील



मान्यवरांच्या हस्ते झालेले हे दीपप्रज्वलन म्हणजे जणु ग्रामस्तरावरची उद्यमशीलता, मधमाशी पालन व्यवसाय आणि त्या अनुषंगाने कृषी पर्यटनाच्या क्षेत्रातील उज्ज्वल भवितव्याचे आश्वासनच म्हटले पाहिजे...



**प्राचार्य तसेच मुख्याध्यापकांची लक्षणीय उपस्थिती...**

बसवंत गार्डनमध्ये दि. १ ते १० ऑगस्ट दरम्यान आयोजिलेल्या दहा दिवसांच्या प्राचार्य/ मुख्याध्यापक परिषदेच्या सांगता समारंभात ते बोलत होते. 'पूर्वा केमटेक'चे संचालक श्री. विजय पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ.श्री. रसाळ यांच्यासह कविवर्य प्रा.श्री. लक्ष्मण महाडिक, श्री. राजेंद्र निकम, श्री. दिलीप अहिरे, प्रा. वारुंगसे, डॉ. किरण अहिरराव हे शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. श्री. विजय पवार यांनी या सर्वांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला.

कविवर्य प्रा. लक्ष्मण महाडिक यांनी आपल्या मनोगतात 'पूर्वा केमटेक'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार, संचालक श्री. विजय पवार तसेच 'पूर्वा' परिवाराचे मार्गदर्शक व ज्येष्ठ कृषितज्ञ डॉ.श्री. बी.बी. पवार यांची या आयोजनाबद्दल प्रशंसा केली. जीवसृष्टीला गती देण्याचे कार्य अनेक घटक करतात. त्यातील मधमाशी हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. निसर्गचक्राचा अभ्यास विद्यार्थी करतात. या वयातच त्यांना 'बसवंत मधमाशी उद्याना'च्या या उघड्या आभाळाखालील प्रयोगशाळेत एकदा आणले पाहिजे; म्हणजे कीटकांबद्दलचे गैरसमज त्यांच्या मनातून दूर होतील आणि निसर्गचक्राला अधिक गतिमान

## अध्यापकांचे प्रशंसादायक अभिप्राय

बसवंत गार्डनमध्ये मधमाशी पालनाचा अतिशय सुंदर प्रकल्प राबविण्यात येत आहे. शिक्षक परिषदेच्या निमित्ताने मधमाशीचे मानवी जीवनातील स्थान अतिशय चांगल्या प्रकारे प्रात्यक्षिकांसह अनुभवायला मिळाले. हा माझ्यासह अनेकांचा कदाचित पहिलाच अनुभव असेल. ग्रामीण भागातील उद्योजकतेसाठी एक आदर्श असा हा प्रोजेक्ट आहे. जिल्ह्यातील शिक्षकांनी आपल्या विद्यालयाची सहल या ठिकाणी आणून मुलांना एक वेगळा आनंद दिला पाहिजे.

**– उमेश कुलकर्णी (शिक्षक, नाशिक)**

ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी 'बसवंत गार्डन' आणि 'सेवरगांव' हे दोन्ही स्पॉट सहलीसाठी अतिशय उत्तम आणि योग्य आहेत. याद्वारे जीवसृष्टीमधील मधमाशी, तिची जीवनपद्धती त्यांचा अभ्यास करणे सोपे होते. मधमाश्यांचे अनेक प्रकार, प्रजाती यांचाही अभ्यास या ठिकाणी होतो. खेळ आणि मनोरंजनातून आनंददायी शिक्षण घेण्याचे बसवंत गार्डन हे केंद्र आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आणि शाळांनी बसवंत गार्डनला भेटी दिल्या पाहिजेत.

**– अमृत भामरे (शिक्षक, पिंपळगाव ब.)**

करण्यासाठी ते उद्याचे नागरिक म्हणून पुढे येतील. मधमाशी ही परागीभवनाद्वारे पीक उत्पादनाला सहाय्यभूत ठरते. तसेच सृष्टीचे हे जीवनचक्र सदैव सुरू ठेवण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. श्री. विजय पवार आणि श्री. संजय पवार या बंधूंनी राज्यातील प्राचार्य व मुख्याध्यापक यांच्या दहा दिवसीय परिषदेचे आयोजन करून एक मोठा निसर्ग जाणिवेचा वस्तुपाठ शिक्षकांसमोर ठेवला आहे, अशा शब्दात त्यांनी या उपक्रमाचा गौरव केला.

या परिषदेच्या समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना श्री. विजय पवार यांनी सर्वांचे स्वागत केले. या उपक्रमाबद्दल बोलताना ते म्हणाले की, आमचे वडील श्री. अण्णासाहेब पवार यांनी आमच्यावर टाकलेल्या सामाजिक जबाबदारीच्या दायित्वातून थोडे उतराई होण्याचा प्रयत्न आम्ही बंधू करत आहोत. या दृष्टिकोनातून पर्यावरण संवर्धनाबद्दल सातत्याने विविध माध्यमे- स्पर्धांमधून जागृती करत असतो. शेतकरी, शिक्षक आणि विद्यार्थी या सर्वांच्या सहयोगातून आपण पर्यावरण संवर्धन करूया, असे आवाहनही श्री. पवार यांनी केले.

यावेळी डॉ. किरण अहिरराव, दिलीप अहिरे, प्राचार्य वारुंगसे, राजेंद्र निकम यांनीही मनोगत व्यक्त केले. त्यांनी उपस्थितांना बसवंत गार्डनमधील मधमाशी पालन केंद्रामध्ये विद्यार्थी भेटीसाठी सहलींचे आयोजन करण्याचे आवाहन करून या उपक्रमाचे कौतुक केले.

या शिक्षक परिषदेच्या समारोप सत्राच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मधमाशी पालन केंद्राचे प्रकल्प व्यवस्थापक नितीन कराळे यांनी केले तर आभार श्री. संदीप सोनवणे यांनी मानले. या दहा दिवसांच्या परिषदेला राज्यभरातील विविध महाविद्यालये व शाळांचे प्राचार्य तसेच मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ■



**भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ श्री. विभूतिभूषण मिश्रा यांनी आपल्या सहकाऱ्यांसह बसवंत गार्डनला भेट दिली. येथील मधमाशी पालन प्रशिक्षण तसेच इतर विविध उपक्रमांविषयी त्यांनी समाधान व्यक्त केले. सध्या त्यांचा वैज्ञानिक गट मधातील भेसळ ओळखण्याच्या सुलभ पद्धतींविषयी संशोधन करीत असल्याने; या भेटीला विशेष औचित्य होते.** ■